# जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी कार्यालय, नांदेड.

पत्ता : गांधी पुतळयाजवळ,स्टेशन रोड नांदेड. फोन- ०२४६२-२३७१०१,    Email :nandedrdc@gmail.com

**जा.क्र.२०२०/आरबी-१/डेस्क-२/टे-४/CRPC-१४४/प्र.क्र.**    **दि.०५.०४.२०२०**

वाचाः- १) आपत्ती व्यवस्थापन कायदा-२००५ चे कलम ३०, ३३, ३४, ४१ व कलम ५१

२) महसूल व वन विभाग, आपत्ती व्यवस्थापन मदत व पुनर्वसन विभाग, मंत्रालय, मुंबई महाराष्ट्र शासन यांचेकडील अधिसुचना क्र.DMU/२०२०/CR-९२/DISM-१, दि. २५.०३.२०२०

३) या कार्यालयाचे समक्रमांकीत आदेश दि.२५.०३.२०२०

४) फौजदारी दंड संहिता सन १९७३ कलम १४४ (१) (३)

DISTRICT MAGISTRATE NANDED Dist. सत्यमेव जयते

**विषयः- कोरोना विषाणूंचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपायोजना करणेबाबत. (सोशल मिडीया, एसएमएस, व्हॉटसअप, फेसबुक, व्टिटर,टिकटॉक, हॅलो, टेलीग्राम किंवा इतर कोणत्याही सोशल नेटवर्कींग व्दारे जातीय / धार्मिक तेढ वरील आक्षेपार्ह मजकूर, चित्रफीत इत्यादी तसेच अवैध सिमकार्ड वापरावर पाबंदीबाबत.)**

**आदेशः-**

ज्याअर्थी साथरोग प्रतिबंधात्मक कायदा १८९७ मधील तरतुदीनुसार सार्वजनिक आरोग्य विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील अधिसुचना क्र.करोना २०२०/ प्रक्र.५८/आरोग्य ५ दि.१४ मार्च, २०२० मध्ये मला उक्त प्रादुर्भाव रोखण्यासाठी ज्या उपायोजना करणे आवश्यक आहे त्या करण्यासाठी संक्षम प्राधिकारी म्हणून घोषित केले आहे.

आणि ज्याअर्थी, कोरोना संसर्गाच्या अनुषंगाने लॉक डाऊन घोषीत करण्यात आले आहे. सदर काळात काही समाज विघातक / गुन्हेगारी वृत्तीचे लोक दोन समाजामध्ये जातीय तेढ निर्माण होईल, असे संदेश अथवा लोंकामध्ये सभ्रम निर्माण होईल, अशा अफवा / कोरोना बाधीत व्यक्तींची संख्या, त्यांच्या वरील उपचार व त्यात बळी पडलेल्या रूग्णांची संख्या तसेच या विषाणूचा प्रादूर्भाव झालेला परिसर वा सशंयित कोरोना बाधित व्यक्ती याबाबत कोणतीही खातरजमा न करता माहिती, बातमी सोशल मिडिया, विविध प्रसारमाध्यमांमध्ये पसरवत आहेत. त्यामुळे समाजात अकारण भिती उत्पन्न होत असल्याचे जाणवत आहे.

अशा संदेश, अफवा व बातमीमध्ये सार्वजनिक शांतता आणि सुव्यवस्था बिघडविण्याची शक्यता आहे. अशा घटनांवर अंकुश ठेवण्याकरीता तात्काळ प्रतिबंधात्मक उपाययोजना करणे आवश्यक आहे. अशी उपाययोजना फौजदारी प्रक्रिया संहिता कलम १४४ खालील तरतुदींच्या अनुषंगाने जनतेस उद्देशून काढणे आवश्यक असले बाबत माझी खात्री झालेली आहे.

त्याअर्थी मी, डॉ. विपीन इटनकर, भा.प्र.से., जिल्हादंडाधिकारी नांदेड, फौजदारी प्रक्रिय दंड संहिता १९७३ चे कलम १४४ (१) (३) अन्वये प्राप्त अधिकाराचा वापर करून, नांदेड जिल्हयाच्या संपूर्ण कार्यक्षेत्रात फौजदारी दंड प्रक्रिया संहिता सन १९७३ कलम १४४ अन्वये दि.०५.०४.२०२० चे दुपारी २.०० ते पुढील आदेशा पर्यंत मनाई आदेश लागू करीत आहे.

अ) जातीय वैमनस्य, धार्मीक तेढ, समाजात तिरस्कार निर्माण करणा-या कोणत्याही स्वरूपाच्या अनाधिकृत, खोटया बातम्या तसेच कोरोना संबंधी अंधश्रध्दा आणि निराधार माहिती कोणतीही व्यक्ती किंवा व्यक्तीचा समूह प्रसारीत करणार नाही.

आ) सोशल मिडीया, एसएमएस, व्हॉटसअप, फेसबुक, व्टिटर, टिकटॉक, हॅलो, टेलीग्राम किंवा इतर कोणत्याही डिजीटल माध्यमांव्दारे दोन समाजात जातीय तेढ / धार्मिक तेढ निर्माण होईल, असे कोणतेही प्रक्षोभक आणि आक्षेपार्ह संदेश, साहित्य, चित्रफीत इत्यादी कोणतीही व्यक्ती किंवा व्यक्तींचा समूह प्रसारित करणार नाही.

Scanned by CamScanner

# जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी कार्यालय, नांदेड.

पत्ता : गांधी पुतळयाजवळ,स्टेशन रोड नांदेड. फोन- ०२४६२-२३७१०१. Email :nandedrdc@gmail.com

इ) सोशल मिडीया, एसएमएस, व्हॉटसअप, फेसबुक, ट्विटर, टिकटॉक, हॅलो, टेलीग्राम किंवा इतर कोणत्याही सोशल नेटवक्रींग प्लॉटफॉर्मचे ग्रुप ॲडमीन हे आपल्या ग्रुप मधील कोणत्याही प्रक्षोभक आणि आक्षेपार्ह संदेश, साहित्य, चित्रफीत इत्यादी प्रसारणासाठी वैयक्तिकरित्या जबाबदार राहतील.

ई) अवैध, अनाधिकृत सिमकार्ड वापर व बाळगण्यावर पाबंदी.

सदर आदेशाचे उल्लघंन करणारी व्यक्ती अथवा समूह भारतीय दंड विधान संहिता कलम १८८ प्रमाणे तसेच इतर प्रचलित कायदयांतील तरतदीनुसार शिक्षेस पात्र राहील.

उपरोक्त सोशल मिडीया, एसएमएस, व्हॉटसअप, फेसबुक, ट्विटर, टिकटॉक, हॅलो, टेलीग्राम किंवा इतर कोणत्याही सोशल नेटवक्रींचे प्लॉटफॉर्मचे ग्रुप ॲडमीन तसेच वैयक्तिकरित्या सोशल मिडीया वापरणारे व्यक्ती यांना प्रत्येकास आदेशापुर्वी स्वतंत्र नोटीस बजावणी शक्य नसल्याने फौजदारी दंड प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम १४४ (२) अन्वये प्राप्त अधिकारानुसार सदरचा आदेश एकतर्फी काढण्यात आलेला आहे.

याबाबतची माहिती प्रसारमाध्यमे, सर्व शासकीय कार्यालय, सर्व पोलीस स्टेशन, सर्व सार्वजनिक ठिकाणच्या नोटीस बोर्डावर नागरिकांच्या सुविधेसाठी पोलीस विभागामार्फत उपलब्ध करून देण्यात येत आहेत.

सदरचा आदेश हा माझ्या सही शिक्क्यानिशी आज दि.०५.०४.२०२० रोजी दिलेला आहे. सदर आदेशाची तात्काळ अंमलबजावणी करण्यात यावी.

स्वा/-
(डॉ.विपीन इटनकर)भा.प्र.से.
जिल्हादंडाधिकारी नांदेड.

**प्रतिलिपी- माहीतीस्तव सादर**

१. मा.अपर मुख्य सचिव, गृह विभाग (विशेष) मंत्रालय, मुंबई-३२.
२. मा.विभागीय आयुक्त औरंगाबाद.

**प्रतिलीपी - आवश्यक कार्यवाहीस्तव**

३. आयुक्त, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड
४. पोलीस अधिक्षक, नांदेड
५. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नांदेड
६. सर्व उपविभागीय दंडाधिकारी नांदेड जिल्हा
७. सर्व पोलीस उपविभागीय अधिकारी, नांदेड जिल्हा
८. सर्व तालुका दंडाधिकारी नांदेड जिल्हा
९. प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, नांदेड
१०. जिल्हा शल्य चिकीत्सक, नांदेड.
११. व्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, नांदेड
१२. अधिष्ठाता,डॉ.शंकरराव चव्हाण शासकीय महाविद्यालय व रुग्णालय विष्णूपूरी नांदेड.
१३. सहायक कामगार आयुक्त, नांदेड
१४. जिल्हा माहीती अधिकारी नांदेड
१५. केंद्र संचालक आकाशवाणीकेंद्र नांदेड यांना प्रसिध्दीस्तव.

जिल्हादंडाधिकारी नांदेड

Scanned by CamScanner